**<u>नि.दि.मु.क्र.४०/२००९ मधील निशाणी ७९ वरील आदेश</u>**

**(मंगेश मडवळ उर्फ खानोलकर वगैरे वि.ग्रामपंचायत खानोली वगैरे )**

**सीएनआर क्र. एमएचएसआय–०५–०००२८२२००९**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी याकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुतअर्जाचे कामी वादी यांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतकामी नि.१४ येथे मुद्दे काढून दावा मुंबई ग्रामपंचायत कायदा कलम १८० नुसार बाधीत होतो या प्राथमिक मुद्यावर न्यायनिर्णीत केलेला आहे. सदर आदेशाविरुध्द वादी यांनी जिल्हा न्यायालयात नि.दि.अपील क. २०३/२०१५ दाखल केले व त्याचा निकाल होवून दावा पुन्हा फेरचौकशीकरीता पाठविण्यात आला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचेविरुध्द दि.२९/०१/२००९ व दि.२६/०२/२००९ रोजीच्या मासिक सभेतील ठराव हा अवैध, विनाअंमलपात्र, बेकायदेशीर व चुकीचे आहेत असा ठराव होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दावा मिळकतीतून जात असलेली वादीची खाजगी पायवाट ही खानोली राऊळवाडी साखळी ते श्री. सिताकांत प्रभू वगैरे यांचे जमिनीपर्यंत दर्शवून कथीत रस्ता हा प्रतिवादी क्र. १ यांनी नमुना नं. २६ चे रजिस्टरला नोंद करणेकरीता ठराव केला. वस्तुत: खानोली राऊळवाडी साखळी ते श्री सिताकांत प्रभू यांचे जमिनीपर्यत जाणारा कोणताही रस्ता केव्हाही नव्हता अगर नाही. त्यामुळे तो रस्ता वापरण्याचा प्रतिवादी क्र. ३ अगर त्यांचे इतर नावाचे सहहिस्सेदार यांना हक्क नव्हता अगर नाही. सदर बाब दाव्यामध्ये समाविष्ट करून त्याअनुषंगाने अर्जामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. ३ यांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज व परिच्छेद क्र. ५अ व ९ब१ म्हणून जो मजकूर वादीस लिहायचा आहे तो मजकूर धांदात खोटा, खोडसाळ व लबाडीचा असून प्रतिवादी क्र. ३ यास मुळीच मान्य व कबूल नव्हता व नाही. प्रस्तुत अर्ज हा विलंबाने व पश्चात बुध्दीने देणेत आलेला असून वादीस प्रस्तुत अर्ज दाखल करणेचा अधिकार नाही. सबब सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रस्तुतकामी उभयपक्षकारांच्या विधीज्ञांचे युक्तिवाद ऐकले. प्रस्तुत अर्जाचा

अभिलेखावरील कागदपत्रांचा व विधीज्ञांचे युक्तिवादाचा विचार करता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे मासिक सभेतील ठराव हा बेकायदेशीर आहे असा ठराव होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतकामी वादी यांच्या दाव्याचे अवलोकन करता वादी यांनी दाव्यामधील परिच्छेद क्र.०५ मध्ये वादी व अन्य सहभागीदारांची त्यांच्या वापराकरीता असलेली पायवाट ही प्रतिवादी क्र.०१ ग्रामपंचायतीच्या रस्त्याचे नोंदणी बूक मध्ये नोंद करणेच घाट घातला असे स्पष्ट कथन केले आहे. वादी हे दाव्यातील त्यांच्या सदरच्या कथानच्या अनुषंगाने अधिकचे स्पष्टीकरण दाव्यामध्ये समाविष्ट करू इच्छित आहेत. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होत नाही. तसेच वादी यांचा सदरचा अर्ज मंजूर केल्यास भविष्यातील दाव्याची गुंतागूंत कमी होणार असून दोन्ही पक्षकारांमधील सर्व वाद हे एकाच दाव्यामध्ये गुणदोषावर न्यायनिर्णीत होणार आहेत. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार दाव्याचा निकाल गुणवत्तेवर अंतिमरित्या लावण्याकरीता वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये केलेली मागणी मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा नि. ७९ कडील अर्ज मंजूर करणेत येतो.

२. वादी यांनी या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांत दाव्यात दुरूस्ती करून त्याच दिवशी दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2025.12.10 12:48:06 +0530

दि. ०५/१२/२०२५ (एस.जे.चिवटे)

वेंगुर्ला दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर वेंगुर्ला